CMYK



आजपासून बाळे येथील
श्री खंडोबा यात्रेस प्रारंभ

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com गुरुवार दि. २४ नोव्हेंबर २०२२ वर्ष : २१ वे अंक : ५८ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## लाकडे आणण्यासाठी गेलेल्या महिलेसमोर काढली तलवार

**सोलापूर** : लाकडे आणण्यासाठी गेल्यावर एकाने लोखंडी तलवार काढत धमकी दिल्याची घटना दि.२० नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास जुना विजापूर नाका येथे घडली. याप्रकरणी वैशाली वीरसिंग गौड (वय-४०, रा.विजापूर नाका, २ नंबर झोपडपट्टी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.


त्यांच्या फिर्यादीवरून महेश चिमाजी मेटकरी (रा.जुना विजापूर नाका) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी व त्यांच्यासोबत अंजना साळुंखे,प्रियंका साळुंखे असे तिघेजण मिळून पाणी तापविण्याकरिता जुना विजापूर नाका येथील लाकडाच्या वखारीजवळ लाकडे आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांच्या गल्लीत राहणारा महेश मेटकरी हा फिर्यादी यांच्याकडे पाहून जुन्या भांडणाचा राग काढून लोखंडी तलवार हातात घेऊन माझ्याविरुद्ध तक्रार करता का मी तुम्हाला सोडणार नाही असे म्हणून धमकी दिली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहेत.

# एकही गाव कर्नाटकाला नाही देणार, उलट बेळगाव, निपाणीही परत घेणार

सुराज्य/सोलापूर

**कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितलेल्या जत तालुक्यातील गावांचा ठराव २०१२ मधील आहे. सीमा भागातले जे आपले लोक आहेत, त्यांना पूर्ण मदत करण्याचे आम्ही ठरवले आहे. त्यांच्याकरता सध्याही काही योजना सुरू आहेत, आणखीही काही योजना सुरू करण्याचेही नियोजन आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील एकही गाव कुठे कर्नाटकाला देणार नाही, उलट सर्वोच्च न्यायालयात जोरदार बाजू मांडून बेळगाव, कारवार, निपाणी परत घेणार आहोत, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जत तालुक्यातील जनतेला दिला आहे.**

सांगली जिल्हा तसा कर्नाटकाच्या सीमेवरचा जिल्हा. या जिल्ह्यातील जत तालुक्यातील काही गावांना कर्नाटकाशी जोडण्याबाबत तेथील ग्रामपंचायतींनी ठराव केला होता. त्याच अनुषंगाने कर्नाटकाचे मुख्यमंत्री बोम्मई यांनी जत तालुक्यातील काही गावांवर कर्नाटकाचा हक्क सांगितला आहे. यावरून पुन्हा एकदा कर्नाटक-महाराष्ट्र सीमावाद उफाळून आला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्र्यांनी जत तालुक्यातील एकही गाव कुठेही जाणार नाही, असा विश्वास व्यक्त केला आहे.





### तो प्रकार २०१२ मधला

त्या काळात जत तालुक्यातील काही गावांना पिण्यासाठीसुध्दा पाणी मिळत नव्हते. शेतीसाठी पाणी हा विषय खूपच दूरचा होता. त्यासाठी संबंधित गावांनी वारंवार महाराष्ट्र शासनाकडे पाण्याची मागणी केली होती. पण त्यांना पाणी मिळत नव्हते. एक तर आम्हाला पाणी द्या, नाही तर आम्हाला कर्नाटक राज्याशी जोडा, अशी तीव्र भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली होती. त्यातूनच या गावांनी कर्नाटकात समाविष्ट होण्याबाबत ठराव केले होते.

### फडणवीसांचा भर चर्चेवर

नुकतीच राज्यपालांची बैठक झाली आहे, त्याआधी दोन्ही राज्यांतील जलसंधारण मंत्र्यांचीही बैठक झाली होती. अशा बैठका झाल्याच पाहिजे. कारण आपण एकाच देशात राहतो, भारत हा दोन्ही राज्यांचा आहे. त्यामुळे चर्चा झालीच पाहिजे. कारण शेवटी चर्चेतूनच मार्ग निघणार आहे, असे सांगत फडणवीस यांनी दोन राज्यादरम्यान होणाऱ्या चर्चेवरच भर दिला आहे.

### म्हैसाळच्या योजनेतून जतला पाणी

आम्ही सर्वोच्च न्यायालयात लढून बेळगाव, कारवार, निपाणीसह आमची गावे परत मिळवण्याचा प्रयत्न करणार आहोत. जतमधील गावांनी सन २०१२ मध्ये ठराव केला होता. आता कोणीही ठराव केलेला नाही. आम्हाला पाणी मिळत नाही म्हणून त्यांनी तेव्हा असा ठराव केला होता. मी मुख्यमंत्री असताना कर्नाटकसोबत बोलणी केली होती आणि पाणी देण्याचा आपण निर्णय केला होता. म्हैसाळच्या सुधारित योजनेतही त्या गावांना घेण्याचा निर्णय तत्कालीन जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी घेतला होता, असेही फडणवीस यांनी सांगितले.

### केंद्राच्या योजना जतमध्ये

आता जत तालुक्यात पाणी पोहोचणार आहे. या सर्व योजनांना केंद्र सरकारचा पैसा मिळाला आहे. आता कर्नाटकचे मुख्यमंत्री जे बोलले, ते समजून घेण्याची गरज आहे. या सीमा वादाच्या प्रश्नावर आपल्या मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतल्यानंतर अतिशय महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामुळे सीमा भागातील आपल्या लोकांना मदत करण्याचे आपण ठरवले आहे. त्यांच्यासाठी आधीच्या आणि काही नवीन योजना आपण पोहोचवत आहोत, अशा शब्दात फडणवीसांनी जतकरांना दिलासा दिला आहे.

अपंग व्यक्ती अधिकार कायद्याअंतर्गत

## सोलापुरात प्रथमच तीन आरोपींना शिक्षा

सुराज्य/सोलापूर

हैद्रा (ता.अक्कलकोट) येथील अपंग, मुकबधीर, मतीमंद महिलेची छेडछाड करून विनयभंग करणाऱ्या तीनही आरोपीना जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ.शब्बीर.औटी सोलापूर यांनी अपंग व्यक्ती अधिकार कायदा १९९६ च्या कायदा कलम ९२ ड खाली व विनयभंग केल्या प्रकरणी अनुक्रमे दीड वर्षे सक्त मजूरीची व दंड प्रत्येकी २०० ची शिक्षा ठोठावली. या कायद्यान्वये शिक्षा होणारी सोलापूर जिल्ह्यातील ही पहिलीच घटना आहे.



या प्रकरणाची हाकिकत अशी की, पिडीता ही अपंग मुकबधीर मतीमंद आहे व तीच्या पाठीमागे कोणीही नाही हे पाहून व तीच्या अपंगत्वाचा फायदा घेवून आरोपी हुसेन महिबूब मुजावर (वय-२४) सैफन गैबीसाब आतार (वय-२५) व खाजा महिबूब भीयान (वय-२१) यानी त्या पीडीतेची छेड-छाड काढून तिचा विनयभंग केला होता. त्यावेळी आरोपींना जागेवरच पकडून पीडीतेचा जवाब घेतला गेला नाही. कारण ती पिडीता काही बोलू शकत नव्हती.तिची तपासणी डॉक्टरांनी व मूकबधिर शाळेच्या शिक्षकाकडून केली असता त्यांच्यासमोर ही ती काही बोलू शकली नाही. त्यामुळे या प्रकरणात पिडिताची साक्ष नोंदविता आली नाही. या केस मध्ये सरकार पक्षातर्फे एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले.यामध्ये तपासी अधिकारी पोलीस उपायुक्त संतोष गायकवाड, ठाणे अंमलदार व डॉक्टर यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. यामधील मूळ फिर्यादी व नेत्र साक्षीदार फितूर होऊन ही सरकारी वकिलाने परिस्थिती जन्य पुराव्यावर केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपींना शिक्षा ठोठावली. सरकार पक्षातर्फे जिल्हा सहकारी वकिल प्रदीपसिंग रजपूत, सरकारी वकील माधुरी देशपांडे व नागनाथ गुंडे यांनी तर आरोपीकडून ॲड.माणिक राठोड यांनी काम पाहिले. पैरवी म्हणून पोलीस कॉन्स्टेबल दिनेश कोळी यांनी मदत केली.



बाळीवेस येथील मल्लिकार्जुन मंदिरात पहिल्या व दुसऱ्या नंदी ध्वजाच्या सराव काठीचे पूजा करून यात्रेच्या तयारीला सुरुवात

## ११० वर्षांच्या इंद्रभुवनाचे महिनाअखेरपर्यंत होणार नूतनीकरण

सुराज्य/सोलापूर

सोलापूरच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या महापालिका आवारातील इंद्रभुवन इमारतीच्या नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या महिना अखेर पर्यंत हे काम पूर्ण होणार आहे, अशी माहिती कंजर्वेशन आर्किटेक्चर मुनिश पंडित यांनी दिली.

महापालिकेच्या आयुक्त शितल तेली - उगले यांनी बुधवारी सकाळी इंद्रभुवन इमारतीच्या नूतनीकरण कामाची पाहणी केली. सुरू असलेल्या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आणि आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी नगर अभियंता संदीप कारंजे, कंजर्वेशन आर्किटेक्चर मुनिश पंडित यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. ११० वर्षांच्या इंद्रभुवन या हेरिटेज वास्तूला जतन करण्यासाठी स्मार्ट सिटीच्या ५.१३ कोटीच्या निधीतून नूतनीकरण करण्यात येत आहे. साधारणतः गेल्या दहा महिन्यापासून हे इमारत नूतनीकरणाचे काम नेटक्या पद्धतीने सुरू आहे. सनरक्षण हेरिटेज कन्सल्टंट या कंपनी मार्फत हे नूतनीकरणाचे काम सुरू आहे. सुमारे दीडशे कारागीर यासाठी परिश्रम घेत आहेत.



**कारागिरांनी इमारतीला गतसौंदर्य प्राप्त करून दिले : पंडित**

इंद्रभुवन इमारत नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या महिन्याच्या अखेरपर्यंत हे काम पूर्ण होईल. महापालिकेच्या प्रमुख अधिकाऱ्यांची कार्यालये या इंद्रभुवन इमारतीत पुन्हा स्थलांतरित करण्यात येतील. अतिशय उत्कृष्ट पद्धतीने कारागिरांनी या इमारतीला गत सौंदर्य प्राप्त करून दिल्याची माहिती आर्किटेक्चर मुनीश पंडित यांनी दिली.

## शाळेतील विद्यार्थ्यांच्या कानातील दागिने पळवले

— फसवणुकीचा गुन्हा दाखल —

**सोलापूर** : शाळेच्या आवारात खेळणाऱ्या एका तिसरी इयत्तेतील विद्यार्थ्यांच्या कानातील सोन्याची बाळी भामट्याने खोटे बोलून पळवून नेली. ही घटना आष्टी (ता. मोहोळ) येथील जिल्हा परिषद शाळेच्या आवारात गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली.

आष्टी येथील तिसरी इयत्तेत शिकणारा विद्यार्थी गुरुवारी सकाळी शाळेच्या आवारात खेळत होता. त्यावेळी एक अनोळखी भामटा त्याला गाठला. आणि तुझ्या आजोबांनी कानातली बाळी दुरुस्तीसाठी मागितली आहे. असे सांगून त्याच्या कानातील २ ग्राम वजनाची (१० हजार) बाळी काढून घेऊन पसार झाला. अशा आशयाची फिर्याद विद्यार्थ्यांच्या वडिलांनी मोहोळ पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. हवालदार पठाडे पुढील तपास करीत आहेत.

पोलीस कोठडीत आरोपीचा मृत्यू

## कोर्टाची सी.आय.डी व मानवाधिकार आयोगाला नोटीस

सुराज्य/सोलापूर

चोरीच्या आरोपाखाली पुणे रेल्वे पोलिसांच्या कोठडीत तरुणाचा संशयित मृत्यू प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी, अशी मागणी करणारी फौजदारी याचिका उच्च न्यायालयात करण्यात आली होती. त्याची दखल घेत उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या गृह विभाग, पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे, राज्य सी.आय.डी आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाला नोटीस बजावत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश नुकतेच दिले.



पुणे लोहमार्ग पोलिसांनी चोरीच्या आरोपाखाली हडपसर येथील रहिवासी असलेल्या नागेश रामदास पवार (वय २९ रा. मोहोळ) याला १७ ऑगस्ट रोजी अटक केली होती. त्यानंतर नागेशला न्यायालयाने २५ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. त्यादरम्यान पोलिसांनी त्याला मारहाण केली, त्यात तो आजारी पडला. पोलिसांनी त्याला पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. रेल्वे पोलिसांनी केलेल्या मारहाणी मुळेच नागेशचा मृत्यू झाल्याचा आरोप करत मयत नागेशच्या बहिणीने ॲड रितेश थोबडे आणि ॲड सागर तांबे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका केली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपल्याला खूप कष्ट पडतात, ऑनलाईन लै सोपय !!

**कल्याण**

---------

**मेन बाजार**

---------

## अक्कलकोट तालुक्यातील शिरवळजवळ चिमुकल्यासह तिघे ठार

सुराज्य/अक्कलकोट


अक्कलकोट -वागदरी मार्गावरील शिरवळ जवळील शिवाजी गायकवाड यांच्या शेतालगत रस्त्यावर बुधवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. या महामार्गाचं काम पूर्ण झाले असतानाही उपलब्ध दोन पदरी मोठ्या रस्त्यावरून वाहने भरधाव वेगाने चालवण्यात येतात. अशातच शिरवळ गावाजवळ मालट्रक आणि कार यांची समोरासमोर धडक झाली.

ही धडक इतकी जोरदार होती की कार चा चक्काचूर झाला. कार चे इंजिन निखळले गेले आणि आत बसलेल्या सात जणांपैकी तीन जणांना बाहेर फेकले गेले. या अपघातात कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर बाहेर फेकले गेलेले तीन जण जखमी झाले आहेत. यामध्ये तीन ही जण गंभीर असल्याचे डाक्टरांनी सांगितले. अपघातमध्ये कार चालक हैदरअली खुदबोदीन मुल्ला (वय



४०), सलमा खालीद लस्केरी (वय ४८), कुमारी अयेजा इमामसाब कडलस्कर ( वय २, सर्व रा. भारपेठ गल्ली, इंडी जि. विजयपूर) असे जागीच ठार झालेल्या तिघांचे नांव आहे. आणखी खालीद लस्केरी (वय ५८), जुबेर खालीद लस्केरी (वय २५), समयरा लस्केरी ( वय ८ ) हे तीन जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असल्याचे सांगण्यात आले आहे. हे इंडी कडून







मुलगी पाहण्यासाठी आळंदकडे कारमधून (क्र. एमएच १२, सीवाय ५५५२) निघाले होते. त्यावेळी समोरून कलबुर्गीकडून येणारा शहाबादी फरशीने भरलेली जड मालट्रक (एमएच १२, पीक्यु ८८१८) ने त्यांच्या कारला जोराची धडक दिली. ट्रकची ठोकर बसल्यानंतर कार सुमारे पंधरा फुटापर्यंत फरफटत घेऊन गेला.

ही धडक एवढी जोरदार होती की कारचे इंजिनही निखळले. खिळखिळ्या झालेल्या कारमध्ये बसलेले तरुण व नागरिक - महिला ही बाहेर फेकले गेले. यामध्ये सहा पैकी तिघे जागीच ठार झाले. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, उपनिरीक्षक चंद्रकांत पुजारी, हवालदार प्रवीण वाळके, विपीन सुरवसे, बशीर शेख, चौधरी, बिरप्पा वाघमोडे, नामदेव माने, चिदानंद उपाध्ये, सतीश अवळे, विजय महानुर घटनास्थळी दाखल झाले. शिरवळ तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अप्पाशा देवकर, पोलीस पाटील हुसेनी कारंजे, पप्पू गायकवाड, दयानंद वरनाळे, खाजगी रुग्णवाहिका चालक विश्वनाथ डिग्गे, रत्नाकर डिग्गे यांच्यासह ग्रामस्थांनी घटनास्थळी येऊन मदतकार्य केले.

अपघातानंतर ठप्प झालेली वाहतूक सुरळीत करण्यात आली. या मार्गावर वाहने भरधाव वेगाने जातात. अपघाताची उत्तर पोलिस ठाण्यात नोंद झाले असून मालट्रक चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. मालट्रक व मालट्रक चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. अधिक तपास पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी हे करीत आहेत.

CMYK